






भारतीय कृषि संशोधन परिषद,नवी दिल्ली
सिंधुदुर्ग जिल्हा कृषि प्रतिष्ठान, किर्लोस संचालित

# कृषि विज्ञान केंद्र, सिंधुदुर्ग

# कोंबडी व्यवसाय व्यवस्थापन

कृषि विज्ञान केंद्र, सिंधुदुर्ग या कार्यालयाच्या माध्यमातून खऱ्या अर्थाने कोंबडीपालन या शेतीपूरक जोड व्यवसायाला चालना देण्यात आली. 'गिरिराजा' ही परसातील कोंबडी-पालनासाठी उष्कृष्ठ जात शेतकऱ्यांसाठी या जिल्ह्यात प्रथमत: कृषि विज्ञान केंद्रातर्फे उपलब्ध करुन देण्यात आली. सुरुवातीला परसबागेमध्ये शेतकरी या कोंबड्या पाळत होते. आता बंदिस्त जागेमध्ये कोंबडी पालन होऊ लागले आहे. केंद्रातर्फे सातत्याने कोंबडी पालकांना मार्गदर्शन करण्यात येते व नवीन तंत्रज्ञान शेतकऱ्यापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न करण्यात येतो. शेतकरी बांधवही या उद्योगाकडे सकारात्मक दृष्टीने पाहू लागले आहेत. व आपल्या




परिने कोंबडी पालन हा व्यवसाय अधिक फायदेशीर होण्याच्या दृष्टीने प्रयत्नशिल असतात. हा व्यवसाय दिसतो तेव्हढा सोपा नसुन त्यामध्ये व्यावसायिक दृष्टीकोनातून व्यवस्थापन करणे अत्यंत गरजेचे आहे. व्यवस्थापनातील कलीष्ट बाबी कोंबडी व्यावसायिकांपर्यंत सहज पोहोचाव्यात व शेतकऱ्यांना या व्यवसायामधुन अधिक आर्थिक पाठबळ मिळावे या करिता कोंबडीपालना विषयी शास्त्रोक्त माहिती देण्याचा प्रयत्न या घडीपत्रिकेच्या माध्यमातून करण्यात आला आहे. कोंबडी घरांचे निर्जतुंकिकरण व महत्त्व, कृत्रिमदायी मधील व्यवस्थापन, रानीखेत (मानमोडी) रोगप्रतिबंधक लसीकरण, कोंबडी पालनामध्ये औषधे व खाद्य पुरकांचा वापर या महत्त्वपूर्ण विषयांची तपशिलवार माहिती देण्यात आली आहे.

## कोंबडीघराचे निर्जतुंकिकरण

कोंबड्यांमध्ये जीवाणूजन्य व विषाणूजन्य आजारामुळे मरतुक होते. शेतकऱ्यांना परिणामी आर्थिक नुकसान सोसावे लागते. कोंबडी घरांमध्ये स्वच्छता राखणे तसेच रोगांचा प्रतिबंध करण्यासाठी वेळोवेळी विविध औषधांचा वापर करुन निर्जतुंकीकरण करणे अत्यंत गरजेचे आहे. निर्जतुंकीकरणासाठीची औषधे व त्यांचा वापर या बाबत अधिक माहिती खालील प्रमाणे आहे.

### फॉर्मल्डीहाईड सोल्युशन ४०% या औषधाचा वापर :

कोंबडी घर रिकामे असताना हे औषध २५ मीली १ लि.पाण्यामध्ये मिसळुन फवारणी पंपाच्या सहाय्याने आतुन बाहेरुन फवारणी करावी. औषध नाक, डोळे यांना झोंबते त्यामुळे फवारणी करताना नाक तोंड झाकून घेण्यासाठी फडका बाधावा. डोळ्यात औषध जाऊ नये म्हणून गॉगल वापरायला हरकत नाही.

### ग्लुट्राल्डिहाईड - १६, डायहायड्रॉक्सी औषधाचा वापर :

हे औषध १० मीली प्रति १ लि. पाण्यामध्ये मिसळून फवारणी पंपाने आतुन बाहेरुन फवारणी करावी.

### डी.एल्.डायमिथिल अमोनियम क्लोराईड औषधाचा वापर :

हे औषध ४ मीली प्रति १ लि. पाण्यामध्ये मिसळुन फवारणी पंपाने कोंबडीघरामध्ये आतुन बाहेरुन फवारणी करावी. या सर्व फवारण्या झाल्यानंतरच कोंबडी घरात पिल्ले सोडावीत.



## कृत्रिम दायीमधील व्यवस्थापन

कोंबडीघराचे निर्जतुंकीकरण झाल्यानंतर कोंबडी पिल्ले कृत्रिमदायीमध्ये सोडावीत, त्याकरिता नियोजन कसे असावे हे पुढे पाहुया.

- वर्तमान पत्राचा पेपर गोलाकार पद्धतीने भुशावर पसरावा.
- गोलाकार पद्धतीने १.५ मीटर व्यासाचा पत्रा (चिकगार्ड) त्यावर लावुन घ्यावा.
- चिकगार्डच्या मधोमध उष्णता देण्यासाठी इलेक्ट्रिक बल्ब लावावा.
- १०० पिल्लासाठी १०० वॅटचे दोन किंवा २०० वॅट चा एक बल्ब लावावा.
- खाद्य भाड्यामध्ये न घालता प्लेट मध्ये घालावे.(४–५ दिवस)
- रोजच्या रोज वर्तमान पत्राचा पेपर बदलुन नवीन घालावा.
- ४–५ दिवसांनी पेपर काढून टाकावेत व खाद्यभांड्यामधुन खाद्य देण्यास सुरवात करावी.
- २ × २ फूट लांबी रुंदीचा ब्रुडर उष्णता देण्यासाठी वापरावा. यालाच कृत्रिमदायी म्हणतात.
- ब्रुडरखाली पहिल्या आठवड्यात ९५अंश फॅरनहाईट तापमान असावे व प्रत्येक आठवड्यामध्ये ५ अंश फॅरनहाईटने ते कमी करुन चौथ्या आठवड्यात ८० अंश फॅरनहाईट पर्यंत खाली आणावे.
- प्रत्येक १०० पिल्लामागे खाद्याची २ व पाण्याची २ भांडी वापरावीत, त्यांना अनुक्रमे चिक फिडर व चिक ड्रिंकर असे म्हणतात.
- ब्रुडर व चिक गार्ड यामध्ये ३ फूट अंतर ठेवावे.
- ब्रुडर खाली व चिक गार्डपर्यंत प्रति पिल्लु अर्धा चौ. फूट जागा द्यावी. चौथ्या आठवड्यापर्यंत १०० पिल्लासाठी ५० चौ.फूट जागा ठेवावी.
- पिल्ले वाढीस लागतील त्याप्रमाणे चिक गार्ड मागे सरकवून जागा वाढवावी.

**खाद्य व्यवस्थापन :**

- १–४ आठवडे वयाची पिल्ले लहान असल्याने त्यांना कमी जाडीचे ब्रॉयलर स्टार्टर हे खाद्य द्यावे. बाजारामध्ये वेगवेगळ्या कंपनीचे खाद्य उपलब्ध असते. किंमतीला परवडेल असे खाद्य निवडावे.
- कोंबडीघराच्या जाळी असलेल्या भागामधुन थंड हवा आत येऊ नये म्हणून प्लास्टिक कापडाची पडदी बनवावीत.पडदी आवश्यकतेनुसार वरखाली करण्याची व्यवस्था करावी.

**कोंबड्यांमधील रानीखेत रोग प्रतिबंधक लासोटा लसीकरण लस तयार करण्याची पद्धत :**

- १०० पिल्लासाठी १०० डोस असलेली लासोटा लसची बाटली औषधाच्या दुकानात मिळते. लस विरघळण्यासाठी त्याबरोबर ३ मीली निर्जतुंक पाण्याची बाटली मिळते.



- बर्फाच्या भांड्यामधून लस घरी आणावी व त्याबरोबर २ मीली क्षमतेची सिरिंज विकत घ्यावी.
- निर्जतुंक केलेले पाणी सिरिंजच्या सहाय्याने लस असलेल्या बाटली मध्ये मिसळून द्रावण चांगले हलवावे, व बाटलीचा तळभाग हालाच्या तळभागावर घासावा.
- एकत्रित चांगली मिसळलेली लस सिरिंजच्या मदतीने ड्रॉपर मध्ये घ्यावी. (१००० लसच्या पॅक करिता १ ड्रॉपर मिळतो)

- ड्रॉपर उपलब्ध न झाल्यास डोळयात औषधे टाकावयाचा ड्रॉपर निर्जुतुंक करुन वापरावा.
- लस देताना ड्रॉपरने १ थेंब डोळ्यात किंवा पिल्लाच्या नाकात सोडावा.

### लस देताना घ्यावयाची काळजी.

- लस तयार करताना व देताना लसीचे तापमान ५ अंश सेल्सिअसच्या वर जाणार नाही याची काळजी घ्यावी, त्याकरिता बर्फाचे भांडे जवळ ठेवावे.
- लस तयार केल्यानंतर २ तासाच्या आत पिल्लांना दिली गेली पाहिजे अन्यथा लसीची परिणामकारकता कमी होते.
- ड्रॉपरने मोठे ड्रॉप पडल्यास लस पुरत नाही अशा वेळी लसीमध्ये २ मीली नॉर्मल सलाईन वॉटर मिसळावे व प्रमाण वाढवावे.
- लस दिल्यानंतर पिल्लावर ताण येतो; तो कमी करण्यासाठी इलेक्ट्रॉल पावडर मिसळून पाणी प्यावयास द्यावे. इलेक्ट्रॉल पावडर उपलब्ध न झाल्यास गुळ पाणी द्यावे.

### पंखामधुन रानीखेत (मानमोडी) रोग प्रतिबंधक लस (R 2 B) देण्याची पद्धत

### लस तयार करण्याची पद्धत

- १०० कोंबड्यासाठी १०० चा डोस असलेली लस ची बाटली औषधाच्या दुकानात मिळते.
- लसच्या बाटली बरोबर लस विरघळण्यासाठी ५० मिलीची वेगळी बाटली मिळेल त्यात निर्जतुंक पाणी असते.लस घेतानाच ५ मीली क्षमतेची सिरिंज विकत घ्यावी.
- निर्जतुंक केलेले पाणी सिरिंजच्या सहाय्याने लस असलेल्या बाटलीमध्ये मिसळावे. द्रावण एकजीव होण्याकरिता तळहातावर बाटली घासावी व द्रावण हलवुन घ्यावे.
- एकत्रित चांगली मिसळलेली लस सिरिंजच्या सहाय्याने २ महिने वयाच्या कोंबड्याना पंखामधील त्वचेमध्ये अर्धा मीली प्रति कोंबडी या प्रमाणात द्यावी.



### लस देताना घ्यावयाची काळजी.

- लस देण्याचे काम चालू असताना लसीचे तापमान ५ अंश सेल्सीअसच्या वर जाणार नाही हे पहावे व त्याकरिता बर्फाचे भांडे अथवा थर्मास वापरावा.
- लस तयार केल्यानंतर २ तासाच्या आत लसीकरण पूर्ण होणे आवश्यक आहे. अन्यथा लसीची परिणामकारकता कमी होते.
- लस दिल्यानंतर कोंबड्यावरील ताण कमी करण्यासाठी २० ग्रॅम इलेक्ट्रॉल पावडर पिण्याच्या पाण्यातून द्यावी.

## कोंबडी व्यवस्थापनामध्ये औषधे, खाद्य पुरके इ. चा वापर :

कोंबडीच्या वाढीमध्ये जीवनसत्वाचे कार्य महत्वाचे आहे. दृष्टीचे कार्य व प्रजनन कार्य सुरळीत चालण्यासाठी 'अ' जीवनसत्व आवश्यक असते. 'अ' जीवनसत्वाची कमतरता असल्यास अशक्तपणा, वाढ खुंटणे, रक्ती हगवण, जंताचा प्रादुर्भाव या समस्या उद्‌भवतात. 'ब' जीवनसत्वाची कमतरता आढळल्यास पाय लुळे पडणे. स्नायुचे वंद्यत्व इ. समस्या उद्‌भवतात. कोंबड्यांमध्ये विविध रोगासाठी प्रतिकार शक्ती वाढविण्यासाठी प्रतिजैवकांचा वापर करावा. १०० पिल्लांसाठी लागणारी औषधे त्यांचे प्रमाण, देण्याचा कालावधी याबाबत सविस्तर माहिती खालील प्रमाणे

- पिल्ले प्रवासातुन आल्यामुळे ताण दूर करण्यासाठी पहिल्या दिवशी इलेक्ट्रॉल पावडर २० ग्रम २ लिटर पाण्यात मिसळुन द्यावी.
- व्हायमेराल 'अ' जीवनसत्व पुरक औषध१-५ दिवसाच्या कालावधी मध्ये २ लिटर पाण्यामध्ये ५ मीली द्यावे.
- २-५ दिवस वयाच्या पिलांना एन्रोफ्लॉक्झासिन १० टक्के हे रोग प्रतिबंधक औषध १ मीली २ लिटर पाण्यातून द्यावे. हे औषध उपलब्ध नसल्यास सेफालेक्सिन अर्धा ग्रॅम किंवा टेट्रासायक्लीन हायड्रोक्लोराईड पावडर अर्धा ग्रॅम २ लिटर पाण्यातुन पिल्लांना द्यावी. (३-४ दिवस)
- कोंबडी पिलांची वाढ चांगली व्हावी म्हणून ५-१० दिवस कालावधी मध्ये 'ब' जीवनसत्व पुरवठा करणारे औषध रोज १५ मीली. पाण्यातून द्यावे.
- कोंबडी १.५ महिन्याची झाल्यावर लीवर टॉनीक ५ दिवसाकरीता रोज ५ मीली पाण्यातून द्यावे.
- कोंबड्यामध्ये जंताचा प्रादुर्भाव टाळण्याकरिता एक महिन्यावरील पिल्लांना 'अल्बेंन्डेझॉल नावाचे जंतनाशक ३० मीली पाण्यातून एकाच डोस मध्ये द्यावे.
- कोंबड्यांना देण्यात येणारे पाणी नियमितपणे निर्जतुक केले गेले पाहिजे; त्याकरिता डी. एल्. डायमिथिल अमोनियम क्लोराईड नावाचे औषध रोज १ मीली १० लिटर पाण्यातून द्यावे. किंवा पोटॅशिय परमॅगनेट औषधाचे १ ते २ कण पाण्यात टाकून पाणी निर्जतुक करावे.



## १ महिन्याहून अधिक वयाच्या कोंबड्यांचे व्यवस्थापन

- चार आडवडे पूर्ण झाल्यानंतर कृत्रिम उष्णता देणे बंद करावे.
- ब्रुडर बाजुला काढून ठेवावेत व प्रति कोंबडीमागे १ चौरस फूट जागा करावी.
- खाद्याची मोठी भांडी वापरावीत. पाण्यासाठी अॅटोमॅटीक ड्रिंकर वापरावेत.

- कोंबड्यामध्ये एकमेकांना बोचण्याची प्रवृत्ती असते, त्यामुळे कोंबड्या पिसे उपटतात त्यावर त्वरीत उपाय योजना करावी. व यंत्राच्या मदतीने चोच बोथट करावी याला इंग्रजीत डिबिकिंग असे म्हणतात.
- कोंबडी घरामधील उष्णता कमी करण्यासाठी पडदी बाजुला कराव्यात. छपरावर गवत किंवा पेढा टाकून अच्छादन करावे.
- कोंबडयाना ब्रॉयलर फिनिशर (थोडे जाडसर, गोळीदार) खाद्य वापरावे.
- ५०-६० दिवसाच्या कोंबडयांना पंखामधील R2 B, रानीखेत रोग प्रतिबंधक लस द्यावी.
- कोंबडी घरामध्ये भाताचे कराल (तुस) किंवा लाकुड भुसा इ.चे आच्छादन ओलसर होणार नाही याची काळजी घ्यावी. त्याकरिता अधुन मधुन चुना पावडर मिसळावी.
- कोंबडी विक्री योग्य झाल्यानंतर वजन काट्यावर वजन करुन विक्री करावी.



## कृषि विज्ञान केंद्रामधील उपलब्ध सुविधा

- कोंबडी पालन प्रशिक्षण व प्रमाणपत्र देण्याची सुविधा.
- एक दिवस वयाची गिरिराजा, कडकनाथ, जातीची कोंबडी पिल्ले तसेच लाव्हे / बटेर पिल्लाचा मागणीनुसार पुरवठा.
- ३ आठवडे वयाच्या कोंबडी पिल्लाचा मागणीनुसार पुरवठा.
- सुधारित पद्धतीने परसबागेतील कोंबडी पालना विषयी मार्गदर्शन

## अधिक माहितीसाठी संपर्क


**प्रा.परेश आंबरे**
विषयतज्ञ, पशुसंवर्धन.
9421235762

**डॉ. मंदार गीते**
कार्यक्रम समन्वयक
9422595512

# कृषि विज्ञान केंद्र,

किर्लोस, ता. मालवण, जि. सिंधुदुर्ग. दुरध्वनी- (०२३६५) २८०२६२, २८०१५७

e-mail-kvksin@rediffmail.com www-kvksindhudurg.com



श्री गणेश/९४२२३८९५५५